**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल केलेली तक्रार**

**क्र. : मुमाआ/नों. क्र. ८५२१/२१/त. क्र. १९/२३/०१**

**Shri. Ajay Bende**
43, Metro House, 3rd Marine Street,
4th Floor, Dhobitalao, Mumbai 400 002.

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ व का) सी विभाग**
बृहन्मुंबई महानगरपालिका सहाय्यक आयुक्त
सी विभाग यांचे कार्यालय,७६, श्रीकांत पालेकर मार्ग,
चंदनवाडी , मरीन लाईन्स, मुंबई ४०० ००२.

**प्रथम अपिलिय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता सी विभाग**
बृहन्मुंबई महानगरपालिका सहाय्यक आयुक्त
सी विभाग यांचे कार्यालय,७६, श्रीकांत पालेकर मार्ग,
चंदनवाडी , मरीन लाईन्स, मुंबई ४०० ००२.

| | | |
|---|---|---|
| **तक्रारीचा दिनांक** | : | २८.०७.२०२१ |
| **सुनावणीचा दिनांक** | : | **०६.०१.२०२३/२४.०३.२०२३** |
| तक्रारदार | : | उपस्थित |
| जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

**उक्त प्रकरणी दिनांक ०६.०१.२०२३ रोजी आयोगाने पुढीलप्रमाणे आदेश दिलेले आहेत:**

तक्रारदार यांनी दि. ३०.१२.२०१९ रोजी दाखल केलेल्या द्वितीय अपीलाबाबत अपील क्र.मुमाआ / नों.क्र.६१८१-६२०१/१९/अ.क्र.३४१-३६१/२०/०१ नुसार "Please allow me to inspect all the Files & Papers, Notice copy, Demolition Records/Reports, Photos, Final Order, along with intimation letter from Legal Department and each and every documents and then issue me documents as per my requirement related to notice served / issued / given by your department" बाबत माहिती मागितलेली असून राज्य माहिती आयोगाने दि. २४.०३.२०२१ रोजीच्या आदेशान्वये जन माहिती अधिकारी यांना असे आदेश देण्यात आले आहेत की, आयोगाचे आदेश प्राप्त झाल्यानंतर अपिलकर्ता यांच्याशी संपर्क साधून १५ दिवसात अपिलकर्ता यांना संबंधित अभिलेखांचे निरीक्षण करण्याची संधी देण्यात यावी आणि त्यांना हव्या असलेल्या माहितीच्या छायांकित प्रती प्रत्येक प्रकरण ५० पृष्ठांपर्यंत विनामूल्य देण्यात यावी. (अपिलकर्ता यांना ५० पृष्ठांच्या वर माहिती पाहिजे असल्यास प्रत्येक पृष्ठांसाठी नियमित शुल्क आकारुन माहिती पुरविण्यात यावी.) तथापि, तक्रारकर्त्यांना अद्याप माहिती मिळाली नसल्याने तक्रारदार यांनी

दि.२८.०७.२०२१ रोजी आयोगापुढे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये तक्रार दाखल केली आहे.

तक्रारदार यांनी त्यांच्या मूळ माहिती अर्जान्वये मागितलेली माहिती अद्याप तक्रारदार यांना मिळालेली नसल्याचे सांगितले.

आजच्या तक्रारीच्या सुनावणीस तक्रारदार उपस्थित. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

तक्रारदार यांनी विशद केले की, त्यांना अद्याप माहिती प्राप्त झालेली नाही. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित असल्याने तक्रार तहकूब करण्यात येत आहे.

सदर तक्रारीची **पुनर्सुनावणी दिनांक १७.०३.२०२३ रोजी दुपारी ३.०० वाजता** आयोगात प्रत्यक्ष आयोजित करण्यात येत आहे. तक्रारदार, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी पुढील सुनावणीस माहितीसह उपस्थित राहावे. त्यानंतर या प्रकरणी अंतिम आदेश पारित करण्यात येतील.

आजच्या पुनर्सुनावणीस तक्रारकर्ता यांनी असे विशद केले की, जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्याप पर्यंत माहिती प्राप्त झाली नाही.

जन माहिती अधिकारी आज दुसऱ्यांदा अनुपस्थित आहे.

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ व का) सी विभाग, श्री. सोमेश शिंदे यांना असे आदेश देण्यात यत आहे की, आयोगाचे आदेश प्राप्त झाल्यानंतर १५ दिवसात स्पष्टीकरण सादर करण्यात यावे की, अपीलकर्ता यांना अद्याप पर्यंत माहिती का देण्यात आलेली नाही. तसेच माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे सकृतदर्शनी उल्लंघन केल्यामुळे त्यांच्याविरुद्ध या अधिनियमाच्या **कलम २०(१) व २०(२)** अन्वये कार्यवाही का करु नये. जर जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे स्पष्टीकरण १५ दिवसात आयोगात प्राप्त झाले नाही तर त्यांना याबाबत काहीही म्हणावयाचे नाही असे गृहीत धरुन त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

**आदेश**

**तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक : २४.०३.२०२३**

State Information Commission Maharashtra

**(सुमित मल्लिक)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

*Pragati 24.03.2023*